# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५११७७/१० ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-अभिलेख धारिका क्र. १०९/ ज.मा.अ. व प्र.अ.अ/नियुक्ती/५५६८/सन २०१९. दिनांक /६/२०१९. 05 JUL 2019

### माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ व कलम १९ अन्वये आदेश

**वाचावे** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी मधील तरतुद.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४.

३. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ व कलम १९.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका घेण्याकरीता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण या स्वायत्त सार्वजनीक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी प्राधिकरण हे एक राज्यस्तरावरील कार्यालय असून प्राधिकरणास क्षेत्रिय कार्यालये नाहीत. परिणामी राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूक घेण्यासाठी प्राधिकरणाने प्राप्त अधिकारानुसार राज्य शासनाच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांना जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी या पदावरची कर्तव्य बजावतांना संबंधीत अधिकाऱ्यांनी ई-१, ई-२, ई-३, निवडणूक निकाल, निवडणूक निधी इ. विशिष्ट स्वरुपाची माहिती स्वत:च्या स्तरावर जतन करणे अनिवार्य आहे.

ज्याअर्थी प्राधिकरणाने सहकारी संस्थेच्या निवडणूकीकरीता महसुल व सहकार विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तसेच वकील, प्रमाणित लेखापरीक्षकांची निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली असून संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत अधिकारी यांनी नियम ७१ व नियम ७२ मधील निवडणुक विषयक माहिती सहा महिन्याकरीता किंवा मा. न्यायालय / प्राधिकरणाच्या आदेशास अधिन राहुन सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता स्वत:च्यास्तरावर जतन करणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७२ मधील तरतुदीनुसार काही विशिष्ट माहिती वगळता इतर माहिती *सार्वजनीक तपासणीकरीता* उपलब्ध करणे बंधनकारक केलेले आहे.

ज्याअर्थी प्राधिकरणाने नियुक्त केलेले जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, निवडणूक अधिकारी/प्राधिकृत अधिकारी हे निवडणुक विषयक माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत नागरीकांना उपलब्ध करीत नसल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आले आहे. सदरची बाब पारदर्शकतेस बाधा आणणारी आहे.

ज्याअर्थी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (४) व (५) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकाऱ्यास त्याची किंवा तिची कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी त्याला किंवा त्याला आवश्यक वाटेल अशा अन्य कोणत्याही *अधिकाऱ्याचे* सहाय्य मागता येईल व पोटकलम (४) अन्वये ज्याचे साहाय्य मागवण्यात आले आहे असा कोणताही *अधिकारी* त्याचे किंवा तिचे साहाय्य मागणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्यास संपूर्ण सहकार्य करील आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या कोणत्याही उल्लंघनाच्या प्रयोजनार्थ, असा अन्य अधिकारी जन माहिती अधिकारी असल्याचे समजण्यात येते. सदर तरतुद विचारात घेता निवडणूक विषयक माहिती देण्याकरीता जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत अधिकारी यांचे सहाय्य घेणे पडल्यास आणि अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंन झाल्यास संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत अधिकारी हे जन माहिती अधिकारी म्हणून समजण्यात येणार आहेत.



Scanned by CamScanner

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १६१ मधील तरतुदीनुसार निवडणूकीकरीता नियुक्त केलेले जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, निवडणुक निर्णय अधिकारी, प्राधिकृ अधिकारी हे *"लोकसेवक"* या सदरात मोडतात.

ज्याअर्थी सहकारी संस्थेची निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे, नि:पक्षपणे, भयमुक्त व मोकळया वातावरणात पार पडण्याच्या दृष्टीने निवडणूक विषयक माहिती माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत नागरीकांना उपलब्ध होणे बाबत प्राधिकरण खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: आदेश :-**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ व कलम १९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण निवडणूक विषयक माहिती माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत उपलब्ध होण्याकरीता खालील प्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करीत आहे.

| **अ.क्र.** | **प्राधिकरणाने निवडणूकीकरीता घोषित केलेले अधिकारी/कर्मचारी** | **कार्यक्षेत्र** | **पदनाम** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | निवडणूक निर्णय अधिकारी | संबंधीत संस्था | जन माहिती अधिकारी |
| २. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | जिल्हा | प्रथम अपिलीय माहिती अधिकारी |
| ३. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | विभाग | प्रथम अपिलीय माहिती अधिकारी |
| ४. | प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | वॉर्ड/तालुका | प्रथम अपिलीय माहिती अधिकारी |
| ५. | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी | वॉर्ड/तालुका | प्रथम अपिलीय माहिती अधिकारी |

सदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय माहिती अधिकारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिनियम २००५ मधील तरतुदीचे काटेकोर पालन करावे.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशाने.**

०५/०७/१९

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
३. निवडणूक निर्णय अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव :-**

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned by CamScanner